Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 12pp.1-4

ISSN:-2230-7850

**Research Papers**

# “पुरातत्वीय दिशादर्शक साधन वीरगळ”

श्री . अनिल खताल जांभळे
M.A. M. Ed संशोधक विद्यार्थी
सोलापूर विद्यापीठ सोलापूर .

## प्रस्तावना :—

इतिहासाच्या अभ्यासाचे एक वस्तुरूपी पण अविनाशी असणारे वीरगळ हे साधन महत्वाचे ठरते . हे साधन प्राचीऩ मध्ययुगीन व आधुनिक काळातील इतिहासासाठी उपयुक्त पडणारे आहे . वीरगळ एखाद्या शिलालेखाप्रमाणेच घडलेल्या घटनेची अगदी संक्षिप्त पण महत्वपूर्ण माहिती देणारे प्राथमिक दर्जाचे अस्सल साधन ठरते . वीरगळ ही परंपरा भारतात सर्व प्रांतामध्ये आढळून येते . विशेषतः महाराष्ट्र कर्नाटक़ आंध्रप्रदेश़ तामिळनाडू या राज्यामध्ये दक्षिणेकडे ही परंपरा मोठया प्रमाणावर टिकून राहिलेली दिसते . सोलापूर जिल्ह्यातदेखील या परंपरेमधूनच वीरगळांचे विविध प्रकार पहावयास मिळतात . मात्र काही दुर्मिळ वीरगळ येथे इतर भागांपेक्षा जास्त आढळतात .

वीरगळ-व्याख्या ः

अनेक इतिहास संशोधकांऩी विद्वानांनी आणि वीरगळ अभ्यासकांनी वीरगळाच्या कितीतरी व्याख्या केलेल्या आहेत . त्यापैकी महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे पाहता येतात .

वीरगळाच्या व्याख्या वेगवेगळया संकल्पनेवर आधारीत वेगवेगळया ग्रंथांमधून केलेल्या दिसतात . मृत पावलेल्या वीराची पूजा करणे यातूनच वीरगळनिर्मिती सुरू झालेली दिसते . म्हणजेच वीरगळ व वीरपूजा यांचा जवळचा संबंध आहे .



व्याख्या ः

1) 'शूर पुरूषांच्या स्मारकशिळा म्हणजे वीरगळ' होय .

2) युध्दात किंवा एखाद्याा साहसी कृत्यात गतप्राण झालेल्या शूर पराकमी पुरूषांना 'वीर' असे म्हणतात व त्यांच्या स्मृतीसाठी उभ्या केलेल्या दगडांना 'वीरगळ' असे म्हणतात .

3) भारतीय संस्कृती कोष ः कर्नाटकात जे वीरकल्लू म्हणून ओळखले जातात . त्यांनाच महाराष्ट्रात वीरगळ असे म्हणतात .

4) हॉपकिन्स या लेखकाने केलेली व्याख्या ः रणांगणांवर लढता लढता जो वीरमरण स्वीकारतो व तो यक्ष लोकांचा एक भाग बनतो . त्याचे वीरगळ तयार केले

जाते .

5) महाभारत ः मृत्युने जो यक्षलोकी पोहोचला असतो तो शस्त्राने मरण पावलेला शूरवीर असते अशी व्याख्या वीरगळाची महाभारतात केलेली आढळते . संस्कृत साहित्यातून आणि ग्रंथांमधून वीरगळांबाबतची वारंवार उल्लेख येतो .

6) जो युध्दामध्ये शौर्य व पराक्रमामुळे मरणं पावलेला असतो . त्याचे मृत्यूनंतरचे जग कसे असेल यावर वीरगळाची निर्मिती झालेली असते त्यास वीरगळ असे म्हणतात .

ज्याप्रमाणे संकृत साहित्यामध्ये वीरगळांबाबत माहिती व व्याख्या मिळते त्याप्रमाणेच कन्नड साहित्य़ गुजरात साहित्य यामध्येदेखील वीरगळांबाबत ब-याच व्याख्या मिळतात . वीरगळ ही संकल्पना राजस्थाऩ उत्तरप्रदेश़ मध्यप्रदेश़ महाराष्ट्र हिमाचल प्रदेश़ दक्षिण भारत अशा भारताच्या विविध भागामध्ये सापडते . असे असले तरीही महाराष्ट्रात सापडणा-या वीरगळांवर काहीही लिहिलेले नाही . वीरगळ ही ज्याप्रमाणे मरण पावलेल्या शूरांची असतात त्याप्रमाणेच ती मरण पावलेल्या स्त्रियांचीही असतात . तसेच केवळ युध्दात मरण पावलेल्या शूरवारांची वीरगळ तयार केली जातात असे नसून चांगले कार्य करून मरण पावलेल्या इतरही शूरांची वीरगळ तयार केली जात असत . आपल्या राजासाठी़ गावासाठी़ धर्मासाठी मरण पावलेल्यांचीदेखील वीरगळ तयार केली जात असत . यामुळे वीरगळांचे विविध प्रकार पडतात . त्यांचाही अभ्यास महत्त्वाचा ठरतो .

**वीरगळ संकल्पना ः**

वीरगळ ही संकल्पना हिंदू संस्कृतीमधील आध्यात्मिक विचारातून बाहेर पडलेली आहे . आपल्या संस्कृतीमध्ये मोक्ष किंवा स्वर्गप्राप्तीरा फार महत्वाचे स्थान होते . ते मिळविण्यासाठी माणूस जिवंतपणी खूप चांगले काम स्वर्गात प्रवेश मिळविण्यासाठी माणूस जी चांगली कृत्ये करीत असे . त्यामध्ये लढाया़ पशूरक्षण़ मातृभूमीचे रक्षण इ . चा समावेश होता . त्याबरोबर सती जाणे़ दिलेला शब्द पाळणे़ त्यासाठी मरण स्विकारणे यासही स्थान होते या . सर्व संकल्पना या वीरगळनिर्मितीचे एक कारम ठरतात . मृत्यूनंतरचे जीवन ही वीरगळनिर्मितीची प्रेरणा ठरते . यासाठी गीतेमधील श्रीकृष्णाने अर्जुनास दिलेला संदेश महत्त्वाचा ठरतो . कौरव़ पांडवांच्या रणभूमीवर युध्दाच्या तयारीत असलेला अर्जुन जेव्हा निष्क्रिय बनतो तेव्हा श्रीकृष्ण त्याला असा संदेश देतो की़ "युध्दभूमीवर हरलास व मेलास तर स्वर्ग मिळेल आणि जिंकलास तर पृथ्वीवर राज्य मिळेल ." या संदेशानुसार रणांगणावर धारातीर्थी पडणे म्हणजे स्वर्गप्राप्ती ही खूणगाठ माणसाच्या मनाने बांधले आणि म्हणूनच अशा शूरवीरांच्या स्मारकशिळा तयार करण्याची पध्दत सुरू झाली . चांगले काम केल्यानंतर मृत्यू आलेल्या माणसाची स्मारके म्हणजेच वीरगळ बनविणे ही प्रथा अनादिकाळापासून चालत आलेली आहे . मरणोत्तर एखाद्या माणसाचे केलेले कौतुक किंवा समाजाने त्याला दिलेली शाबासकी किंवा दिलेले प्रशस्तीपत्रक म्हणजे वीरगळ होय . यावरून वीरगळाची संकल्पना स्पष्ट होते .



**वीरगळाची रचना ः**

वीरगळ हे वस्तूरूपी साधन असल्यामुळे दगडाच्या साहाय्याने त्याची निर्मिती केली जाई . मुद्दाम घडविलेल्या आयताकृती व एका बाजूने गोलाकार किंवा कोनाकृती असलेल्या काळया पाषाणावर वीरगळाचे अंकन करीत असत . सर्वसाधारणपणे वीरगळाची उंची तीन फुटापासून सहा फुटापर्यंत असे आणि रूंदी अंदाजे दीड ते दोन फूट असे . अशा मोजमापाच्या दगडी शिळेवर **3 ़4 4** कप्प्यामध्ये वीरगळ बनविले जाई . कधी-कधी **6** ते **8** कप्पेदेखील केले जात असत . सर्व साधारणपणे **3** कप्प्यांचे वीरगळ मोठया प्रमाणावर बनविली जात . सामान्य वीरगळामध्ये तळाच्या कप्प्यात लढाईचे दृश्य़ दुर्सया कप्प्यामध्ये मरत व्यक्ती स्वर्गाकडे नेत असल्याचा देखावा आणि तिस-या कप्प्यामध्ये स्वर्गप्राप्तीचा देखावा दाखविला जाई . यापेक्षा वेगळया पध्दतीची वीरगळासुध्दा बनविली जात असत . अशा असामान्य किंवा दुर्मिळ वीरगळांचा येथे विचार केलेला आहे .

**वीरगळांचे प्रकार ः**

वीरगळांचे विविध प्रकार आढळतात . त्यामध्ये युध्दनिदर्शक वीरगऴ पशूहल्लानिदर्शक वीरगऴ बलिदान व आत्मबलिदान व आत्मबलिदान निदर्शक वीरगऴ पशूनिदर्शक वीरगऴ सतीगळ इत्यादींचा समावेश होतो . युध्दनिदर्शक वीरागळामध्ये ओळखता येतात . उदा . पायदळ लढाई़ घोडदळ लढाई़ हत्तीदल लढाई़ राज्यकर्त्यांची लढाई़ अधिर्कायांची लढाई इ . युध्दनिदर्शक वीरागळांमध्ये पशूंवर झालेले आक्रमण आणि ते परतविण्यासाठी झालेली लढाई तसेच त्यामध्ये आलेले वीरमरण हे प्राधान्याने दाखविले जाते . चांगल्या कामासाठी़ आपल्या राजाच्या यशासाठी किंवा आध्यात्मिक भावनेतून आत्मबलिदान व बलिदान केले जात असे . त्यांच्याही स्मारकशिळा वीरगळ म्हणून ओळखल्या जात असत . लढाईमध्ये धारातीर्थी पडलेल्या स्त्रियांची किंवा सती गेलेल्या स्त्रियांचीदेखील वीरगळ तयार करण्याची पध्दत होती . त्यास सतीचा दगड किंवा सतीगळ असे म्हटले जाई . ज्याप्रमाणे माणसे चांगल्या कामासाठी मरण पत्करत असत . त्याप्रमाणे मानवी आयुष्याशी बांधले गेलेले कुत्रा़ घोडा़ गाढव इ . प्राणीसुध्दा आपल्या मालकासाठी प्रसंगी आपला जीव देत असत . त्यामधूनसुध्दा वीरगळनिर्मिती होत असे . असे वीरगळाचे प्रकार सर्वत्र आढळतात . त्यांची रचना ही जर वेगळी असेल तर आणि वीरगळाचे अंकन हे विशेष असेल तर त्याला दुर्मिळ वीरगळ म्हणून ओळखले जाते . अशा काही दुर्मिळ वीरगळांचाच आढावा आपल्यासमोर मी मांडत आहे .

**सोलापूर जिल्हातील दुर्मिळ वीरगळ ः**

Indian Streams Research Journal
Vol.1,Issue.V/June; 2012

**1) किल्लांवरील हल्लानिदर्शक वीतगळ ः**

सोलापूर जिल्ह्यात अगदीच दुर्मिळ असलेला वीरगळाचा हा प्रकार अकलूज आणि बावडा या ठिकाणी पहावयास मिळतो . किल्ल्यासाठी झालेल्या लढाई मध्ये किंवा किल्ल्यावर केलेल्या आक्रमणामध्ये मरण पावलेल्या शूरवीरांच्या स्मारकशिळा या दोन गावात आहेत . हे वीरगळ कसे ओळखावे हा प्रश्न पडेल . परंतु किल्ल्याचे जंगे म्हणजेच किल्ल्यांच्या तटबंदीवरील कंगोरे या वीरगळांमध्ये दिसतात . अकलूज येथील असा वीरगळामध्ये तर किल्ला जिंकण्यासाठी सर्व प्रकारच्या सैन्याचा वापर केलेला दिसतो . मरण पावलेल्या वीरांच्या डोक्यावर किल्ल्यांचे कंगोरे दिसतात . याचा उल्लेख मेमोरियल स्टोन या ग्रंथातदेखील आहे . बावडा येथील या वीरगळामध्ये किल्ल्यांसाठी मरण पावलेल्या शूरवीराकडे जंग्यामधून डोकावून पाहणारी माणसे दिसतात . ही अत्यंत दुर्मिळ अशी वीरगळ आहेत .

**2) स्त्री वीरगळ ः**

स्त्री वीरगळ म्हणजे सतीचा दगड नव्हे . खास स्त्रियांकरता अंकन केलेली ही वीरगळ असतात . यामध्ये स्त्रियांचे द्वंद्वयुध्द दाखविलेले असते . ते माळशिरस येथील स्त्री वीरगळात पहावयास मिळते . हातामध्ये धनुष्यबाण घेतलेल्या दोन स्त्रिया पशूंचे रक्षण करीत असताना वेळापूर येथील अशा वीरगळात पहावयास मिळतात् तर मोहोळ येथील भानेश्वर मंदिराच्या पायथ्याशी मातृवीरगळ पहावयास मिळते . आपल्या मुलासाठी मरण पावलेली आई या वीरगळात दिसते . त्री वीरगळ सहसा इतर ठिकाणी आढळत नाहीत आढळतात ते सतीचे दगड होय .

**3) सतीगळ ः**

सतीगळ म्हणजे सती गेलेल्या स्त्रियांचा दगड किंवा लढाईमध्ये मरण पावलेल्या स्त्रियांचे स्मारक सतीगळाची विविधता या जिल्ह्यात आहे . त्यामध्ये माळशिरस् वेळापूर् वडवळ् कुरकंभ् भाळवणी इ . गावातील अशी वीरगळ दुर्मिळ आहेत . जी सती जाते त्यासाठी बनविलेल्या वीरगळात स्त्रीचा हात दाखविला जातो . मात्र जी लढाईत मरण पावलेली असते तिचे घोडयावर बसलेले शिल्प व शेजारी सतीचा हात दाखवितात . सतीगळ व लढाईमध्ये मरण पावलेल्या स्त्रिया यांची स्मारके यामध्ये फरक असतो .

**4) बलिदाननिदर्शक वीरगळ ः**

या पध्दतीच्या वीरागळांमध्ये दोन प्रकार असतात . एक आत्मबलिदान आणि दुसरे जाहीरपणे केलेले बलिदान . आत्मबलिदानात एकटाच माणूस् त्याचे कापलेले शीर व तलवार असत . त्याने स्वतःच्या हाताने आत्मबलिदान केलेले असते . असे वीरगळ सिध्दापूर येथे आहे . राजाच्या यशासाठी् गावाच्या कल्याणासाठी शपथ घेऊन त्यासाठी जाहीरपणे सर्वांसमक्ष त्या शूरवीराचे मस्तक कापले जात असे . बलिदाननिदर्शक वीरग्अळ वेळापूर् मंगळवेढा येथे पहावयास मिळते .

**5) पशूहल्लानिदर्शक वीरगळ ः**

स्वतःच्या किंवा गावातील पशूंवर हल्ला झाल्यास तो परतवून लावणे व त्यासाठी झालेल्या लढाईत धारातीर्थी पडणे ही पशूहल्लानिदर्शक वीरगळाची कारणपरंपरा असते . अशी वीरगळ खुडुस् वेळापूर् महाळूंग् सोलापूर याठिकाणी पहावयास मिळतात . गावावर पशूसाठी झालेला हल्ला वेळापूर येथील वीरगळावर अंकित केलेला आहे .

**6) सहा आणि आठ कप्प्यांचे वीरगळ ः**

वीरगळ हे सामान्यतः तीन कप्प्यांचे असते . परंतु येथे अशीही वीरगळ मिळतात . जास्तीत जास्त कप्पे वीरगळांवर दाखविणे म्हणजेच एकाच पराक्रमी वीराच्या अनेक लढाया दाखविणे किंवा एकाच गावातील अनेक सूरवीरांच्या स्मारकशिळा एकत्रित दगडावर दाखविणे होय . अशी वीरगळ येथे आहेत . माळशिरस आणि वेळापूर येथे एका चौकोनी शिळेवर चारही बाजूंनी अंकित केलेले वीरगळ पहावयास मिळते . हा देखील फार दुर्मिळ प्रकार आहे .

**7) लढाईनिदर्शक वीरगळ ः**

लढाई हे तर वीरगळाच्या निर्मितीचे मुख्य कारण होय . मात्र या जिल्ह्यामध्ये लढयांच्या विविध प्रकारांनुसार तयार केलेली वीरगळ सापडतात . नुसतीच हत्तीदलाची लढाई र्तिहे या गावातील वीरगळावर पहावयास मिळते तर हत्तीदल व घोडदलाची लढाई बावडा या गावात पहावयास मिळते . पायदळाची लढाई अकलूज् माळशिरस् खुडूस् वेळापूर येथील वीरगळावर पहावयास मिळते .

अशा रितीने दुर्मिळ असणारी वीरगळ या जिल्ह्यात आढळतात . सोलापूरच्या मध्ययुगीन इतिहासावर या वीरगुळांमुळे चांगलाच प्रकाश पडतो . तसेच सोलापूरचा जागृत इतिहासही यामुळे समजतो . वास्तविक वीरगळांवर काहीही शिलालेख नसतानादेखील वीरगळामुळे फार मोठा इतिहास प्रकाशात येतो . म्हणून इतिहासाच्या या मुक्या परंतु वस्तूरूपी साधनांवर जिल्हानिहाय संशोधन होणे गरजेचे आहे .

संदर्भ ः

1 . भारतीय संस्कृतीकांश खंड - 9 पृ . 19 .
2 . कित्ता पृ . 19 .
3 . महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती पृ . 71 .
4 . महाभारत स्त्रीपर्व पृ . 24 .
5 . मेमोरियल स्टोन्स् पृ . 3 .
6 . कित्ता पृ : 251 ते 254
7 . हिरोंस्टोन फॉम गोवा अ सोशो कल्वरल स्टडी पृ : 1 .
8 . मराठी विश्वकोष खंड -17 पृ . 22 23 .
9 . मेमोरियल स्टोन्स् पृ : 263 ते 266 .
10 . प्लेट कमांक 12 .
11 . प्लेट कमांक 34 .
12 . प्लेट कमांक 56 .
13 . प्लेट कमांक 78 .
14 . प्लेट कमांक 910 .
15 . प्लेट कमांक 1112 .
16 . प्लेट कमांक 1314 .